॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon



जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. ३१ ऑक्टोबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात आतंरमहाविद्यालयीन युवक महोत्सव युवारंग २०२६ आणि दिव्यांग महोत्सव आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धांमध्ये खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव यांनी सर्वसाधारण विजेतेपद तर महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय, चोपडा यांनी सर्वसाधारण उपविजेतेपद पटकावले. दरम्यान मान्यवरांच्या उपस्थितीत अतिशय जल्लोषपूर्ण वातावरणात पारितोषिक वितरण करण्यात आले. या युवारंग-२०२६ चे वैशिष्ट्ये म्हणजे युवारंगाचा माजी विद्यार्थी ते प्रमुख अतिथी हेमंत पाटील यांच्या हस्ते युवारंगाचे पारितोषिक वितरण करण्यात आले. तसेच केसीआयआयएलच्या मार्फत झालेल्या युवास्पार्क स्पर्धेचे पारितोषिक वितरण देखील करण्यात आले.

युवारंग महोत्सवाच्या पारितोषिक वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्रमुख अतिथी सिनेकलावंत तथा हास्यजत्रा फेम हेमंत पाटील, स्वागताध्यक्ष राजेंद्र नन्नवरे, कार्याध्यक्ष ॲड॰ अमोल पाटील, विद्यार्थी विकास समन्वयक समितीचे अध्यक्ष नितीन झाल्टे, यांच्यासह व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य प्रा. जगदीश पाटील, प्रा. शिवाजी पाटील, डॉ. पवित्रा पाटील, प्रा. उज्ज्वल पाटील, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, सीए रविंद्र पाटील, संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ प्रा. योगेश पाटील, विष्णू भंगाळे, प्राचार्य एस.आर. पाटील, डॉ. कांचन महाजन, डॉ. ऋषीकेश चित्तम, डॉ. विशाल पराते, वैशाली वराडे, डॉ. संदीप नेरकर, अमोल मराठे, डॉ. धीरज वैष्णव, प्राचार्य एच.एम. पाटील, माजी विद्यार्थी संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे, श्रीमती नेहा जोशी, दिनेश चव्हाण, भानुदास येवलेकर, प्रा. विजय प्रकाश शर्मा, श्रीमती स्वप्नाली महाजन (काळे), डॉ.विवेकानंद चव्हाण, डॉ. संजय पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रवीण महाले मंचावर उपस्थित होते.

प्रमुख अतिथी सिनेकलावंत तथा हास्यजत्रा फेम हेमंत पाटील म्हणाले की, युवारंग सारख्या महोत्सवात प्रत्येक स्पर्धकाने स्वत:ला झोकून द्यायला पाहिजे. विद्यार्थ्यांनी कुठलेही न्यूनगंड न बाळगता जिंकण्यासाठी प्रत्येक स्पर्धांना सामोरे जाण्याचे आवाहन त्यांनी केले. माणसाने एआय बनवले आहे, एआयने माणसाला बनवलेले नाही त्यामुळे विद्यार्थ्यांनी मोबाईलमध्ये न रमता ग्रंथालयातील पुस्तकांमध्ये रमावे असा सल्लाही त्यांनी तरूणाईला दिला.

स्वागताध्यक्ष तथा व्य.प.सदस्य राजेंद्र नन्नवरे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी कलेची जोपासना आणि कलेची साधना केल्यास कलेच्या प्रांतात मोठी संधी आहे असे सांगितले. कलाविष्कार ही एक साधना असून यासाठी सातत्य असले पाहिजे. युवारंगमध्ये सांघीक भावना दिसून आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

युवारंग महोत्सवाचे कार्याध्यक्ष अमोल पाटील यांनी मनोगत व्यक्त करताना युवारंग महोत्सवात कार्यसंस्कृती दिसून आली असून ती अनुभवायला देखील मिळाली असे सांगितले. युवारंग महोत्सवाच्या व्यवस्थेला सहकार्याची भावना आजच्या तरूणाईत दिसून आली असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच महोत्सवात सर्वांनी संघभावनेने काम केल्याचे कौतूक केले.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू प्रा. व्ही.एल.माहेश्वरी यांनी 'उम्मीद की किरण तूम हो, हौसलों का नया रंग तुम हो', असे म्हणत तरूणाईंचे लक्ष वेधले. सातत्य, शिस्त, वेळेचे महत्व, परिश्रम,चिकाटी ही पंचसुत्री आत्मसात करण्याचे आवाहन केले. युवारंग मध्ये विद्यार्थ्यांनी कलात्मकतेचे दर्शन घडवून आपली क्षमता सिध्द केली आहे, परंतु इथून पुढील प्रवासात उत्कृष्ठतेचा ध्यास घेवून पुन्हा तयारीला लागा असा मौलीक सल्ला त्यांनी दिला.

युवारंग महोत्सवात विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रवीण महाले यांनी युवारंग अहवालाचे वाचन केले. त्यानंतर ज्ञानेश्वरी नन्नवरे, प्रणव ईखे, पवन मराठे, नंदीनी जाधव या विद्यार्थ्यांनी तर संघ व्यवस्थापक डॉ. चंद्रशेखर सुतार, डॉ.अमोल नंदवाळकर, डॉ. संदीप खरे यांनी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर युवारंग व दिव्यांग महोत्सवातील विविध स्पर्धांच्या निकालाचे सीलबंद पाकीट प्रा.उज्वल पाटील, प्रा.मनोज पाटील यांनी कुलगुरू प्रा.माहेश्वरी यांच्याकडे सुपूर्द केल्यानंतर मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. सुत्रसंचलन डॉ विणा महाजन, खेमराज पाटील यांनी केले तर आभार कुलसचिव डॉ विनोद पाटील यांनी मानले. याप्रसंगी राष्ट्रीय एकता दिनानिमित्त प्रतिज्ञा देण्यात आली. तसेच राष्ट्रगीतानंतर युवारंग महोत्सवाची सांगता करण्यात आली.

युवारंग- २०२६ स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे :-

संगीत

१) भारतीय शास्त्रीय गायन-एकल :- खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (प्रथम), भुसावळ कला, विज्ञान आणि पी.ओ.नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ (द्वितीय), विद्यापीठ प्रशाळा, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (तृतीय)

२) भारतीय शास्त्रीय वाद्य संगीत - तालवाद्य-एकल - महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय, चोपडा (प्रथम), भुसावळ कला, विज्ञान आणि पी.ओ.नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ (द्वितीय), खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (तृतीय)

३) भारतीय शास्त्रीय वाद्य संगीत- स्वरवाद्य-एकल :- महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय, चोपडा (प्रथम), खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (द्वितीय), एम . डी .पालेशा वाणिज्य महाविद्यालय, धुळे (तृतीय)

४) भारतीय सुगम संगीत:- खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (प्रथम) ,भुसावळ कला, विज्ञान आणि पी.ओ.नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ (द्वितीय), विद्यापीठ प्रशाळा, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (तृतीय)

५) पाश्चिमात्य गायन-एकल :- भुसावळ कला, विज्ञान आणि पी.ओ.नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ (प्रथम) , विद्यापीठ प्रशाळा, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (द्वितीय), महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय, चोपडा (तृतीय)

६) भारतीय समुहगान :- भुसावळ कला, विज्ञान आणि पी.ओ.नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ (प्रथम), महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय, चोपडा (द्वितीय), खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (तृतीय)

७) पाश्चिमात्य समूहगान :- जी.एच.रायसोनी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअरिंग अँड मॅनेजमेंट, जळगाव (प्रथम), भुसावळ कला, विज्ञान आणि पी.ओ.नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ (द्वितीय), खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (तृतीय)

८) भारतीय लोकसंगीत वाद्यवृंद :- खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (प्रथम), महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय, चोपडा (द्वितीय), विद्यापीठ प्रशाळा, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (तृतीय)

९) पाश्चिमात्य वाद्यसंगीत-एकल :- महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ .सुरेश जी .पाटील महाविद्यालय, चोपडा (प्रथम), खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (द्वितीय), पूज्य साने गुरूजीविद्या प्रसारक मंडळाचे एस.आय.पाटील कला, जी.बी. पटेलविज्ञान आणि एस.टी.के. व्ही. संघ वाणिज्य महाविद्यालय, शहादा (तृतीय)

१०) नाट्यसंगीत-एकल :- खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (प्रथम), भुसावळ कला, विज्ञान आणि पु.ओ.नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ (द्वितीय), विद्यापीठ प्रशाळा, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (तृतीय)

नृत्य कलाप्रकार

१) भारतीय लोक समूहनृत्य:- महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ .सुरेश जी .पाटील महाविद्यालय, चोपडा (प्रथम), खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (द्वितीय), विद्यापीठ प्रशाळा, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (तृतीय)

२) भारतीय शास्त्रीय नृत्य :- के .सी .ई .सोसायटीचे एस .एस .मनियार लॉ कॉलेज, जळगाव (प्रथम), खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (द्वितीय), विद्यापीठ प्रशाळा, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (तृतीय)

वाङ्मयीन कला प्रकार

१) वक्तृत्व स्पर्धा :- जयहिंद एज्युकेशन ट्रस्टचे झेड. बी. पाटील महाविद्यालय, धुळे (प्रथम), खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (द्वितीय), जी.एच.रायसोनी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअरिंग अँड मॅनेजमेंट, जळगाव (तृतीय)

२) वादविवाद स्पर्धा :- के.सी.ई. सोसायटीचे प्रताप महाविद्यालय, अमळनेर (प्रथम) , जी.एच.रायसोनी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअरिंग अँड मॅनेजमेंट, जळगाव (द्वितीय), लोकसेवक मधुकरराव चौधरी कॉलेज ऑफ सोशल वर्क, जळगाव (तृतीय)

रंगमंचीय कला प्रकार

१) प्रहसन :- पूज्य साने गुरूजी विद्या प्रसारक मंडळाचे औषधीनिर्माणशास्त्र महाविद्यालय, शहादा (प्रथम), विद्यापीठ प्रशाळा, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (द्वितीय), भुसावळ कला, विज्ञान आणि पी.ओ.नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ, (तृतीय)

२) मुक अभिनय :- विद्यापीठ प्रशाळा, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (प्रथम), खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (द्वितीय), आर.सी. पटेल इन्स्टिटयूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर (तृतीय)

३) नक्कल :- खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (प्रथम), विद्यापीठ प्रशाळा, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (द्वितीय), भुसावळ कला, विज्ञान आणि पी.ओ.नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ (तृतीय)

ललित कला

१) रांगोळी :- महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय, चोपडा (प्रथम), रवींद्र निकम कॉलेज ऑफ फॉर्मसी(बी.फार्मसी) गोंदुर, धुळे (द्वितीय), आर.सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरपूर (तृतीय)

२) पोस्टरमेकींग :- गजमल तुळशीराम पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार (प्रथम), महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय, चोपडा (द्वितीय), खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (तृतीय)

३) चिकटकला:- गजमल तुळशीराम पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार (प्रथम), महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय, चोपडा (द्वितीय), जी.एच.रायसोनी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअरिंग अँड मॅनेजमेंट, जळगाव (तृतीय)

४) व्यंगचित्र:- महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय, चोपडा (प्रथम), खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (द्वितीय), गजमल तुळशीराम पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार (तृतीय)

५) माती कला:- गजमल तुळशीराम पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार (प्रथम), खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (द्वितीय), के.सी.ई.. सोसायटीचे एस.एस. मणियार लॉ कॉलेज, जळगाव (तृतीय)

६) स्थळ चित्र:- महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय, चोपडा (प्रथम), खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (द्वितीय), एच.जे. थिम कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड सायन्स, मेहरूण, जळगाव (तृतीय)

७) स्थळ छायाचित्र :- खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (प्रथम), जी.एच.रायसोनी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअरिंग अँड मॅनेजमेंट, जळगाव (द्वितीय), श्री. काकासाहेब हिरालाल मगनलाल चौधरी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार (तृतीय)

८) इंस्टॉलेशन :- पूज्य साने गुरूजी विद्या प्रसारक मंडळाचे औषधीनिर्माण शास्त्र महाविद्यालय, शहादा (प्रथम), महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय, चोपडा (द्वितीय), बी.पी. आर्टस एस.एम.ए. सायन्स आणि के.के.सी. कॉमर्स कॉलेज, चाळीसगाव (तृतीय)

९) मेहंदी :- महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय, चोपडा (प्रथम), आर.सी.पटेल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट, शिरपूर (द्वितीय), पूज्य साने गुरूजी विद्या प्रसारक मंडळाचे औषधीनिर्माण शास्त्र महाविद्यालय, शहादा (तृतीय)

कला प्रकार निहाय सर्वसाधारण विजेते :-

१) संगीत :- खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव
२) नृत्य :- खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव
३) वाड्मयीन कला प्रकार :- जी.एच.रायसोनी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअरिंग अँड मॅनेजमेंट, जळगाव
खान्देश एज्युकेशन सोसायटीचे प्रताप कॉलेज, अमळनेर
४) रंगमंचीय कला प्रकार :- विद्यापीठ प्रशाळा, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
५) ललित कला :- महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय, चोपडा

जिल्हा निहाय प्रोत्साहनपर फिरते चषक

जळगाव जिल्हा

प्राचार्य डॉ. अरविंद चौधरी, जामनेर पुरस्कृत स्व. वसुंधरा चौधरी फिरता चषक :-
भुसावळ कला, विज्ञान आणि पी.ओ. नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ

धुळे जिल्हा

प्रा. मुक्ता महाजन, जळगाव पुरस्कृत स्व. मातोश्री शांताबाई जगन्नाथ महाजन फिरता चषक :-
जयहिंद एज्युकेशन ट्रस्टचे झेड॰ बी. पाटील महाविद्यालय, धुळे

नंदुरबार जिल्हा

प्रा. सुनील बाबुराव कुळकर्णी, देशगव्हाणकर पुरस्कृत स्व. बाबुराव कुळकर्णी देशगव्हाणकर फिरता चषक :-
गजमल तुळशीराम पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार

युवारंग २०२६ सर्वसाधारण विजेते महाविद्यालय

विजेता :- खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव - (डॉ. जी डी. बेंडाळे स्मृतिचषक)
उपविजेता :- महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय, चोपडा (कै. कुसुमताई मधुकरराव चौधरी स्मृतिचषक)

कै. भाईसाहेब वाय. एस. महाजन मुलींची वक्तृत्व स्पर्धा

प्रथम - खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (पाटील ऐश्वर्या)
द्वितीय - जी.एच. रायसोनी इ न्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअरींग ॲण्ड मॅनेजमेंट, जळगाव (केवलरमाणी प्रिया)
तृतीय - के.सी.ई सोसायटीचे एस.एस. मणियार लॉ कॉलेज, जळगाव (पाटील वैष्णवी)

कै. शांताबाई अभ्यंकर मराठी भावगीत गायन विजेत्यांची यादी

प्रथम - खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (माकोडे समीक्षा)
द्वितीय - खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (मॅथ्यू सोजी सी. जॉर्ज)
तृतीय - भुसावळ कला, विज्ञान आणि पु.ओ.नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ (धोमणे ऋषीकेश)

कै. ग. वी. अभ्यंकर मराठी नाट्यगीत गायन विजेत्यांची यादी

प्रथम - खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (मॅथ्यू सोजी सी. जॉर्ज)
द्वितीय - भुसावळ कला, विज्ञान आणि पो. ओ.नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ (धोमणे ऋषीकेश)
तृतीय - युनिव्हर्सिटी स्कुल्स, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (जगदाळे अनुराग)

कबचौउमवि बहिणाबाई करंडक आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा

प्रथम - युनिव्हर्सिटी स्कुल्स, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव रू. ७००१ /- रोख पारितोषिक
द्वितीय - खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव रू. ५००१ /-
तृतीय – शारदा शैक्ष णिक व सामाजिक संस्थेचे विद्याधन वाणिज्य महाविद्यालय, धुळे रू. ३००१ /-
चतुर्थ - पूज्य साने गुरूजी विद्या प्रसारक मंडळाचे एस.आय.पाटील कला, जी.बी. पटेल विज्ञान आणि एस.टी.के.व्ही. संघ वाणिज्य महाविद्यालय, शहादा रू. २००१ /-

दिव्यांग कला महोत्सव पारितोषिक विजेते :-

साहित्यकला: वक्तृत्व स्पर्धा –

प्रथम: वेदांत रत्नाकर महाजन, सरदार वल्लभभाई पटेल कला ववविज्ञान महाविद्यालय, ऐनपूर
द्वितीय: शरद अशोक कुंभार, :- महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय, चोपडा
तृतीय: पुर्वा प्रशांत इंगळे, डॉ. अण्णासाहेब जी.डी. बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव

भारतीय सुगम संगीत -
प्रथम: माकोडे समीक्षा लक्ष्मीकांत, खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव
द्वितीय: पूर्वा प्रशांत इंगळे डॉ. अण्णासाहेब जी.डी. बेंडाले महिला महाविद्यालय, जळगाव

भारतीय शास्त्रीय गायन-
प्रथम : माकोडे समीक्षा लक्ष्मीकांत, खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव
द्वितीय : पवन मनोज मराठे, विद्यावर्धिनी संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महा., धुळे

भारतीय शास्त्रीय वाद्य संगीत (ताल वाद्य) –
प्रथम : पाटील धनंजय मुकेश, विद्यावर्धिनी संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महा., धुळे,
द्वितीय : पवन मनोज मराठे, विद्यावर्धिनी संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महा., धुळे

भारतीय शास्त्रीय वाद्य संगीत (स्वर-वाद्य)- पवन मनोज मराठे, विद्यावर्धिनी संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महा., धुळे

ललितकला: स्थळचित्र
प्रथम:उज्ज्वल रविद्र पाडवी, गजमल तुलशीराम पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार
द्वितीय: निशा ज्ञानेश्वर बारी, अ. र. भा. गरुड कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शेंदूर्णी
तृतीय: निखिल नारायण पाटील, आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, शिरपूर

ललितकला: व्यंगचित्र
प्रथम: सुनंदा फोपा पावरा, गजमल तुलशीराम पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार
द्वितीय:निशा ज्ञानेश्वर बारी, अ. र. भा. गरुड कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शेंदूर्णी
तृतीय: पूर्वा प्रशांत इंगळे, डॉ. अण्णासाहेब जी.डी. बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव

ललितकला: मातीकला
प्रथम: निखिल नारायण पाटील, आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, शिरपूर
द्वितीय: निशा ज्ञानेश्वर बारी, अ. र. भा. गरुड कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शेंदूर्णी
तृतीय: सुनंदा फोपा पावरा, गजमल तुलशीराम पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार

केसीआयआयएल मार्फत प्रायोजित युवास्पार्क स्पर्धा :विद्यार्थ्यांमध्ये उद्यमशीलता, संशोधन आणि नवोन्मेषाच्या दृष्टिकोनातून वाढ झाली आहे. 'युवास्पार्क' हे मागील वर्षापासून युवा पिढीला महत्त्वाचे व्यासपीठ आणि प्रेरणा देणारा उपक्रम आहे. विद्यार्थी आणि तरूण नवोन्मेषकांना त्यांच्या कल्पना आणि प्रत्यक्ष समस्यांवरील उपाय तज्ज्ञ व परीक्षकांसमोर सादर करण्यासाठी हे एक व्यासपीठ आहे. यावर्षी कृषी, हेल्थटेक, डिपटेक आणि ओपन इनोव्हेशन या क्षेत्रांमध्ये ५३ नाविन्यपूर्ण कल्पना व प्रकल्प सादर झाले. सर्वोत्कृष्ट १५ स्पर्धकांना केसीआयआयएल मार्फत एक वर्षभर मोफत सहाय्य दिले जाणार आहे. यात तज्ज्ञ समितीने सादर झालेल्या प्रकल्पांचे परीक्षण करून त्यातून सर्वोत्तम तीन प्रकल्पांना विजेते म्हणून घोषित केले.

स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे:

१) प्रथम क्रमांक: संघ सदस्य: नेत्रदीप आर. कदम,

प्रकल्प/कल्पना: वापरलेल्या खाद्यतेलावर सूक्ष्मजीवकिण्वनाद्वारे पर्यावरणपूरक बायोसर फॅक्टंट तयार करणे आणि उर्वरित अवशेषांतून जैविक खत निर्मिती करणे, तसेचडिजीटल प्लॅटफॉर्मद्वारे टाकाऊ तेलाचे संकलन करणे, असा हा प्रकल्प आहे. यातून प्रदूषण कमी होऊ शाश्वत औद्योगिक पर्याय उपलब्ध होतात.

महाविद्यालय: युनिहर्सिटी इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

२) द्वितीय क्रमांक: श्री. खंडू नेरकर

प्रकल्प/कल्पना: OroC Kit ही लाळेवर आधारित, वेदनारहित चाचणी असून तोंडाचा कर्करोगाचे लवकरनिदान करण्यास मदत करते.ग्रामीण भागातही परवडणारी प्राथमिक तपासणी १५मिनिटात उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे.

महाविद्यालय: आर.सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, शिरपूर

३) तृतीय क्रमांक: कु. कल्याणी बोरसे

प्रकल्प/कल्पना: Braillescriptionहि औषधे ओळखण्यासाठीची किफायतशीर,डिजीटल नसलेली प्रणाली आहे. सात स्पर्शचिन्हांद्वारे औषध घेण्याची वेळ आणि मात्रा ओळखता येते. दृष्टीबाधीत व्यक्ती, ज्येष्ठ रूग्ण आणि कमी साक्षर लोकांसाठी ती उपयुक्त आहे. तसेच औषधांबाबतच्या चुका कमी करण्यास मदत करते.

महाविद्यालय: आर.सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेश ॲण्ड रिसर्च, शिरपूर

.....

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ३१ ऑक्टोबर, २०२६

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

जनसंपर्क अधिकारी करीता